डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे,

# फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

## शिष्यवृत्ती विभाग

## तातडीची व महत्त्वाची सूचना

### स्वाधार योजनेचे अर्ज भरणे बाबत

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नवीन प्राप्त झालेल्या शासकीय परिपत्रकानुसार व सूचनेनुसार अनुदानित व विना अनुदानित विभागातील प्रवेशित जे विद्यार्थी पुणे जिल्ह्याच्या बाहेरून आलेले आहेत व अश्या विद्यार्थ्यां पैकी ज्यांना शासनाचे वसतिगृह मिळालेले नाही अशा अनुसूचित जाती, (SC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षी प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांनी फ्रेश व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी स्वाधार शिष्यवृत्ती अर्ज भरलेले होते अशा विद्यार्थ्यांनी ते अर्ज नूतनीकरण करावयाचे आहेत.

सर्व विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेचे अर्ज https://hmas.mahait.org या वेब साइटवर ऑनलाइन पद्धतीने भरवयाचे आहेत. अर्ज भरून झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपीच्या २ प्रती योग्य त्या प्रमाणपत्रासहित दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत महाविद्यालयातील ऑफिस नं ३ मधील शिष्यवृत्ती कार्यालयात श्री. अमित पालकर यांच्याकडे जमा करावेत. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास व त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील.

जे विद्यार्थी नियमित तारखेस अर्ज सादर करणार नाहीत त्यांना शासनाकडून शुल्क प्राप्ती होणार नाही.

Sheo

प्रभारी प्राचार्य

फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

दिनांक : २३-०८-२०२४

प्रभारी प्राचार्य

फर्ग्युसन महाविद्यालय (स्वायत्त),

पुणे-४११००४.

महाराष्ट्र शासन
# सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, पुणे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, स.नं. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे
दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-acswopune@gmail.com

---

जा.क्र.सआसकपुणे/शिक्षण/स्वाधार/२०२४-२५/३३६५ दि.०२.०८.२०२४

प्रति,

अधिष्ठाता/संचालक / प्राचार्य / रजिस्ट्रार (सर्व),

कनिष्ठ/वरिष्ठ/व्यावसासिक/बिगर व्यावसासिक/वैद्यकीय/तंत्र महाविद्यालय,

पुणे जिल्हा.

विषय - सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीताची अवलंबवयाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेची कार्यपद्धती.

संदर्भ - मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. २४९४ दि.३१.०७.२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये समाज कल्याण विभागांतर्गत शासकीय वसतिगृहाचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत आज्ञावली विकसनाचे (Software Development) काम प्रगतीपथावर असून यामध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज ऑनलाईन स्विकृत करण्याबाबतचे मोडयुल दि.३०/०७/२०२४ पासून कार्यरत करण्यात आले आहे. त्यानुसार दि. ३१/०७/२०२४ पासून https://hmas.mahait.org या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत. सन २०२४-२५ पासून नव्याने कार्यरत होत असलेले ऑनलाईन पोर्टल हे शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रीया तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता एकत्रित तयार केले असल्याने शासकीय वसतिगृहास ऑनलाईन अर्ज करणाऱ्या ज्या पात्र अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेअभावी निवड शासकीय वसतीगृहात झालेली नाही अशा विद्यार्थ्याचे अर्ज प्रणालीव्दारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता ग्राह्य धरले जाऊन नियमानुसार पुढील पडताळणीकरीता संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगिनवर अग्रेषित केले जातील.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती महाविद्यालयांच्या सूचना फलकावर प्रदर्शित करावी तसेच समान संधी केंद्रप्रमुखांमार्फत सदर प्रक्रियेची माहिती अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांना द्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(विशाल लोंढे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. आयुक्त,समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

२. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे - ०६

SCAN AnyScanner